गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ● अंक ३४४ वा ● रविवार ०५ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 344 | Date : 05/05/2024 blow Sunday Page 4 Price 4

## नरेंद्र मोदी सरकारमुळेच राम मंदिर होऊ शकलं, राज ठाकरेंचं मोठं विधान

### नारायण राणेंच्या सभेत उद्धव ठाकरेंवरही डागली तोफ!



**कणकवली/दैनिक यश सिद्धी न्यूज**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी बिनशर्त पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे राज ठाकरेंनी आज कणकवलीत नारायण राणे यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. या सभेत त्यांनी महायुतीला पाठिंबा का दर्शवला याबाबत पुन्हा एकदा माहिती दिली. तसंच, नरेंद्र मोदी सरकारमुळेच राम मंदिर होऊ शकलं, असंही राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे म्हणाले, यावेळी मी ठरवंल होतं की मुलाखती द्यायच्या नाहीत. पाठिंबा जाहीर केल्यानंतर ही माझी पहिली जाहीरसभा. २०१४ ते २०१९ च्या दरम्यान मोदींकडून ज्या गोष्टी झाल्या, ज्या । पान २ वर

## सोलापूरची जनता विकासाला प्राधान्य देणार : केंद्रीय गृहमंत्री नितीन गडकरी



**पंढरपूर/प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री श्री नितीन गडकरी यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार श्री राम सातपुते भोसरी माढा लोकसभेचे उमेदवार श्री रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ संबोधित केले.पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी ही यांच्या नेतृत्वाखाली भाजप माहितीचे सरकार सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे मागील दहा वर्षात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केंद्राच्या अनेक योजनेचा लाभ मिळाला असल्याचे सांगून सोलापूरची जनता विकासाला प्राधान्य देणार आहे भाजप माहितीची पुन्हा विजयी करेल असा विश्र्वासही नितीन गडकरी यांनी व्यक्त केले

नितीन गडकरी यांनी सातारा जिल्ह्यातील मान खटाव दहिवडी येथे माढा जाहीर सभेत आज संबोधित केले मधील डिटेल गडकरी यांनी सांगलीतील जत येथे सांगलीमध्ये जाहीर सभेला संबोधित केले आहे. यावेळी मा.आ. प्रशांतराव परिचारक यांनीही आपले सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारांना जास्तीत जास्त मतदान करून मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी उपस्थित भाजप महायुतीचे उमेदवार श्री राम सातपुते यांनी मतदाराला उद्देशून नरेंद्र मोदी यांनी यांच्या नेतृत्वाखाली मागील दहा वर्षापासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनेक योजनांचा लाभ देण्यासाठी आरोग्याची सुविधा असो शेतकऱ्यांना पेन्शन योजना असो गॅस योजना असो अशा अनेक प्रकारच्या योजनेचा लाभ सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक गोरगरीब व्यक्तीने घेतलेला आहे त्यासाठी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी मतदारांनी यावेळी चिन्हाला मध्यम मोदींना मत दिल्यासारखे आहे असे राम सातपुते यांनी सांगितले. यावेळी उपस्थित मा.आ. प्रशांतराव परिचारक भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आमदार गोपीनाथ पडळकर प्रणव परिचारक इत्यादी उपस्थित होते व पंढरपूर तालुक्यातील मतदार मोठ्या संख्येने सभेत उपस्थित होते

## सोलापूर महापालिका हद्दीतील ७७२ मतदान केंद्रावर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रापैकी सोलापूर महापालिका हद्दीत ७७२ मतदान केंद्र येतात. या सर्व मतदान केंद्रावर मतदारांनी मतदान करण्यासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत यावे, यासाठी मतदान केंद्रावर सावलीची सुविधा, पिण्याचे पाणी, प्रत्येक मतदान केंद्रावर ३० ओ. आर. एस. पॉकेट, मतदान रांगेत ठराविक अंतरात खुर्च्या किंवा बेंचची सुविधा, स्वयंसेवक, मोबाईल हेल्थ टीम, प्रथमोपचार किट या उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी दिनांक ७ मे रोजी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी । पान २ वर




## मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज

### ३३७ मतदान केंद्रांवर ३ हजार ७१० कर्मचारी नियुक्त; चोख पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध

**पंढरपूर/प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत जिल्ह्यात सोलापूर-४२ (अ.जा.) व माढा-४३ लोकसभा मतदार संघाचे मतदान दिनांक- ०७ मे २०२४ रोजी होणार आहे. ४२ सोलापूर लोकसभा मतदार संघातील २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून, मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने विविध माध्यमातून जनजागृती केली आहे. नव मतदार आणि महिलांनीही या लोकशाही उत्सवात स्वयंस्फूर्तीने सहभाग घेऊन लोकशाहीला बळकट करण्यासाठी आपले मतदानाच्या अधिकाराचा वापर करावा असे आवाहन सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.


२५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ५५ हजार १३८ मतदार आहेत. त्यापैकी १ लाख ८३ हजार २९२ पुरुष, १ लाख ७१ हजार ८२३ महिला व २३ इतर मतदार तसेच ५५५ सैनिक मतदारांचा समावेश आहे. मतदार संघात ३३७ मतदान केंद्रे असून त्यात आदर्श मतदान केंद्रातंर्गत महिला व्यवस्थापित दोन मतदान केंद्र, दिव्यांग व्यवस्थापित एक मतदान केंद्र आणि युवा कर्मचारी व्यवस्थापित दोन मतदान केंद्र ही मतदान केंद्र विशेष राहणार आहेत. मतदान प्रक्रीया पारदर्शकपणे व सुरळीत पार पाडण्यासाठी केंद्रावर पोलीस बंदोबस्तासह ३ हजार ७१० अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मतदार संघातील १७३ मतदान केंद्रावर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे.

मतदार संघातील प्रत्येक मतदान केंद्रावर वाढती । पान २ वर

## जेडीएसचे नेते एचडी रेवण्णा यांना एसआयटीकडून अटक

**कर्नाटक/दैनिक यश सिद्धी न्यूज**

जेडीएसचे खासदार प्रज्ज्वल रेवण्णा यांच्या सेक्स स्कँडल प्रकरणामुळे कर्नाटकच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सेक्स स्कॅंडल प्रकरण बाहेर येताच प्रज्ज्वल रेवण्णा हे देश सोडून फरार झाल्याची माहिती आहे. तसेच जेडीएसचे नेते एचडी रेवण्णा यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याची माहिती समोर येत आहे. अशातच एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. आता या अपहरण प्रकरणात एचडी रेवण्णा यांना कर्नाटक एसआयटीच्या पथकाकडून अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.एचडी रेवण्णा यांच्या निवासस्थानी घरकाम करणारी



महिला काही दिवसांपासून बेपत्ता झाल्याची तक्रार त्या महिलेच्या मुलाने दाखल केली होती. त्यानंतर एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, सदर महिलेचाही व्हिडीओ या सेक्स स्कॅंडल प्रकरणात असल्याचा संशय पोलिसांना आहे. एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र, न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला. त्यानंतर एसआयटीच्या पथकाकडून एचडी रेवण्णा यांना ताब्यात घेण्यात आले. या संदर्भातील माहिती एएनआयने दिली आहे.

जेडीएसचे खासदार प्रज्ज्वल रेवण्णा यांच्यावर सेक्स स्कॅंडल प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांनी परदेशात पलायन केले. मात्र, खासदार प्रज्ज्वल रेवण्णा हे भारतात येताच कोणत्याही क्षणी त्यांना अटक होणार असल्याची माहिती आहे. प्रज्ज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपाचा । पान २ वर

## देशातील लोकशाही संपवणे हीच मोदीची गॅरेंटी : खा.शरदचंद्रजी पवार

**पंढरपूर/प्रतिनिधी**

इ डी सी बी आय आयसीबी यासारख्या यंत्रणेच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणण्याचा त्यांना तुरुंगात टाकायचे अशा पद्धतीचे हुकूमशाही सध्या देशात सुरू आहे मोदी गॅरेंटी बद्दल नेहमीच बोलताना परंतु या देशातील लोकशाही संपवणे हीच खरी मोदीची गॅरंटी आहे अशी कर्मणी टीका राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खासदार शरदचंद्र पवार यांनी केली

माढा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ आकृतीतील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल आयोजित विशाल सेवेत खासदार पवार बोलत होतेखासदार पवार म्हणाली की उजनी धरणाच्या उभारणीत शंकरराव



मोहिते पाटील यांचा सिंहाचा वाटा होता लोकांच्या हितासाठी साखर कारखाने दूध संस्था काढल्या प्रधानमंत्री व देशाच्या असतो एक राज्याचा नसतो महाराष्ट्रातील अनेक कंपन्या गुजरातला नेण्याचे काम केले यांच्या माध्यमातून विरोधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना अडचणीत आणायची मुख्यमंत्री केजरीवाल सुरेना यांना तुरुंगात टाकली ही हुकूमशाही आहे या देशातील लोकशाही टिकवण्यासाठी भाव काय सांगाडीला

आमदार जयंत पाटील म्हणाले की माढ्यातील निवडणूक ही जनतेने हाती घेतली आहे धैर्यशील च्या उमेदवारीची उमेदवारीने भाजपला शेळके प्रयोग करून सोडले आहे । पान २ वर

## कर दहशतवाद नष्ट करणार, महाविकास आघाडीच्या सभेत ठाकरेंची घोषणा




**धाराशिव/दैनिक यश सिद्धी न्यूज** : शिवरायांनी स्वराज्य उभे करण्यासाठी गुजरातमध्ये जाऊन त्यावेळी सुरतेवर छापा टाकला. आता त्या गुजरातचे दोघेजण महाराष्ट्र लुटत आहेत. आपण केवळ रडगाणे गात रहायचं नाही. तुम्ही सरकार उलथून टाका मी आपलं सरकार आल्याबरोबर जाचक कायदे रद्द करतो. शेतकरी आणि व्यापारी वर्ग मोदी सरकारने जीएसटीच्या कचाट्यात पकडले आहेत. हा कर दहशतवाद आपण नष्ट करून टाकणार असल्याचे आश्र्वासन उद्धव ठाकरे यांनी धाराशिव येथे दिले.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ धाराशिव शहरातील जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, माजी आमदार ज्ञानेश्र्वर पाटील, माजी आमदार राहुल मोटे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

सोयाबीनला भाव नाही, कापसाच्या भावाचे वांदे झाले आहेत, तर कांदा निर्यातबंदीमुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. केवळ निर्यातबंदी केली आहे असे रडगाणे गात बसण्याला अर्थ नाही. निर्यात बंदी मोडून काढायची असेल तर । पान २ वर

# संपादकीय

## राजकारणावरून सिद्ध होते

सर्वच राजकीय पक्ष प्रचाराच्या विविध पध्दती वापरून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. आता याच पध्दतीमध्ये विविध प्रकारचे गौप्यस्फोट करून आपल्या विरोधात असलेल्या पक्षाला अडचणीत आणण्याची नवीन पध्दतही सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये विशेषतः महाराष्ट्रामध्ये विविध राजकीय पक्षांचे नेते ज्याप्रकारे काही वर्षांपूर्वी घडलेल्या घटनांचा उल्लेख करून गौप्यस्फोट करत आहेत ते पाहता या राजकीय पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना मतदारांना आकर्षित करायचे आहे की आपल्या विरोधकांना दुखवायचे आहे हेच कळत नाही. गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी कोणत्या ना कोणत्या वृत्तवाहिनीवर मुलाखत दिली आहे. या मुलाखतीच्या माध्यमातून विविध प्रकारचे गौप्यस्फोटही करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त बोलतानासुध्दा अनेक गौप्यस्फोट करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याने अशा प्रकारचा एखादा गौप्यस्फोट केला की त्याला उत्तर देण्यामध्ये बराच कालावधी जातो आणि ज्याच्याबाबत हा आरोप होता तो नेतासुध्दा वेगळा आरोप करणारा एखादा गौप्यस्फोट करतो. अशा प्रकारे ही राजकीय प्रक्रिया सध्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये तरी रंगतदार होत चालली आहे.महाराष्ट्राचे विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उध्दव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्याच्या दृष्टिकोनातून ट्रेनिंग देऊन तयार करण्याबाबतचे आश्वासन दिले होते आणि आदित्य ठाकरे योग्य प्रकारे तयार झाले की मी दिल्लीला जाईन, असे वचन त्यांनी दिले होते, असा पहिला गौप्यस्फोट उध्दव यांनी केला. फडणवीस यांनी ही माहिती नाकारली असली तरी ऐन निवडणुकीच्या हंगामामध्ये अशा प्रकारची माहिती समोर आणली जात आहे हेसुध्दा महत्त्वाचे आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच्या कालावधीमध्ये फडणवीस, आशिष शेलार, प्रवीण दरेकर, गिरीश महाजन या भाजपच्या मोठ्या नेत्यांना अटक करण्याचा कट रचण्यात येत होता, असा गौप्यस्फोट केला आहे. प्रचाराच्या व्यासपीठावरून मतदारांना 'आम्ही काय देणार किंवा काय करणार' या विषयाला प्राधान्य देण्यापेक्षा हे राजकीय नेते खालच्या पातळीवर टीका करून आपल्या राजकीय विरोधकांची प्रतिमा कशी खराब होईल यालाच प्राधान्य देत आहेत असेच विद्यमान राजकारणावरून सिद्ध होत आहे.

# पर्यावरण वाचवा झाडे लावा झाडे जगवा

मृत्यू महत्त्वाचा संदेश पूर्ण वाचा नाहीतर मृत्यू हा अटळ आहे त्यामुळे पर्यावरण वाचवा झाडे लावा झाडे जगवा

होय मी इथे मृत्यू हा शब्द वापरत आहे कारण हे सत्य आहे ग्लोबल वार्मिंग घेत आहे आपल्या पुढील पिढीचा वेध मित्रांनो सांगण्यात दुःख होत आहे की पुढील तीन वर्षांमध्ये भारताचा वातावरण मध्ये प्रचंड असा बदल होणार आहे आणि तोच बदल ठरणार आहे भावी पिढीच्या मृत्यूला कारण

आपण बघू शकता वातावरणात बदल आणि या आठवड्यामध्ये जगामध्ये भारताच्या तापमान हे तिसऱ्या स्थानावर सर्वात अधिक आहे ते म्हणजे ४४.५ डिग्री सेल्सिअस म्यानमार थायलंड यासारख्या छोट्या देशानंतर भारतासारख्या मोठ्या देशामध्ये ही अवस्था असणे म्हणजे अतिशय धोक्याची घंटा आहे त्यामुळे वरती जसा मी बोललो की मृत्यू हा अटळ आहे आणि ते सत्य आहे



जगाच्या पाठीवर सर्वात जास्त तापमान देश म्हणजे भारत आणि वेळेत जागे झालो नाही तर तो पुढील तीन ते चार वर्षानंतर भारतातील तापमानात बिकट अवस्था निर्माण होईल आता आपण बोनस जीवन जगत आहोत कारण तापमान वाढ ही धोक्याची पातळी ओलांडलेली आहे अजून देखील पुढील तीन वर्ष आपल्याजवळ वेळ आहे त्या वेळेत जर आपण अधिक वृक्ष लागवड जंगल पर्यावरण संवर्धन याकडे जर लक्ष दिले तरच पुढील तीन वर्षांनंतर आपले जीवन जगणे शक्य आहे तीन वर्षांमध्ये आपण जर पर्यावरणाची होणारी हानी रोखले नाहीत तर भविष्यामध्ये प्रचंड वाढलेल्या तापमानामुळे वृक्षांचे किंवा शेतीमधील पिकांचे बीजांकुरण होणार नाही आणि शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रचंड तापमान वाढीमुळे पाण्याची देखील मोठी समस्या निर्माण होणार आहे

आपण कितीही श्रीमंत असलो तरी निसर्गापुढे आपण निमित्त मात्र आहोत हे आपल्याला समजायला हवे आणि त्यांचा विचार करायला हवा वारे माप संपत्ती आपण जमवण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न करत आहोत पण जर निसर्ग आणि पर्यावरण संतुलित नसेल तर आपल्याला ऑक्सिजन देखील मिळणार नाही आणि वातावरणातील तापमानामुळे त्यांच्यासाठी संपत्ती कमावत आहोत त्यांना जगणे मुश्कील होणार आहे आर्थिक संपत्ती पेक्षा हीच हरित संपत्तीकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे मागील दहा ते पंधरा वर्षांमध्ये आपल्या देशाच्या वातावरणामध्ये प्रचंड बदल झाला आहे तापमान हे वाढत आहे मागील १०-१५ वर्षांपूर्वी हेच तापमान ३७ ते ३८ सेल्सिअस एवढे असायचे आता काही शहरांमध्ये ५०ओ ल एवढी तापमान वाढ नोंदवली जाणार आहे त्याला कारणीभूत आहे तो फक्त स्वार्थी वृत्तीच्या मनुष्यप्राणी प्रचंड मोठ्या प्रमाणे सुरू असलेले वृक्षतोड तसेच अवैध जंगलतोड जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये जनावर करण्याच्या शर्यतीमध्ये देशातील पर्यावरणाच्या गुणवत्ता बीमूळ होत आहे नद्यांच्या गटारी झाल्या शहरांमध्ये श्र्वास घेणे मुश्किल झाला आहे सर्वत्र प्रदूषणाने विळखा घातला आहे या सर्वांची प्रचिती म्हणजे विविध प्रकारची रोग राई वाढली आहे शेतीसाठी पूरक वातावरण नाही पाऊस वेळेवर होत नाही आता जर आपण जागे झालो नाही तर पाच वर्षानंतर मृत्यू अटळ आहे देशातील परिस्थिती बघितली तर पर्यावरण सारख्या प्रमुख मागणीवर सरकार देखील निष्क्रिय आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे सरकार मागील वीस वर्षापासून प्लास्टिक बंदी करत आहे बंदी तर राहू द्या निर्मितीमध्ये अधिक वाढ झाली आहे इतर अवैध उद्योगधंदे आहेत त्यामुळे हवेचे तसेच नद्यांचे देखील प्रचंड प्रमाणात दोष प्रदूषण होत आहे तरी पण सरकारी यंत्रणा डोळे झाकून बघायची भूमिका घेत आहे आणि सरकारचा कार्यप्रणाला न बोललेले बरे सरकार कशाप्रकारे काम करत आहे आपण सर्वश्रुत आहोत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ महाराष्ट्र पर्यावरण विभाग तसेच भारतीय हरित लवाद कशाप्रकारे काम करते त्याची ही पोज ५०ओ ल तापमान विशेष म्हणजे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये देखील कोणताही पर्यावरण विषयक धोरणावर बोलत नाही खऱ्या अर्थाने ही निवडून पर्यावरणाच्या मुद्द्यावर होणे अपेक्षित आहे पण नागरिकांना जात धर्म समाज व्यवस्था यामध्ये व्यस्त केला आहे

दुसरी बाजू म्हणजे नागरिकांनी देखील सदर विषयाची म्हणावा तेवढी जाणीव नाही मी या ठिकाणी सर्व जाती-धर्माचे नागरिकांना आव्हान करतो की देवधर्म करण्यामध्ये वेळ घालवण्यापेक्षा निसर्ग हीच खरी आपली संस्कृती आहे आणि तोच खरा धर्म आहे आणि त्याचा संवर्धन आपण करावे पर्यावरणाचे संवर्धन केले तर निरोगी व संपन्न जीवन होईल आपल्या संतांनी ५०० वर्षापूर्वीच हे देखील सांगितलेले आहे त्यामुळे माझं म्हणणं असं आहे की पर्यावरण वाचवा जग वाचवा झाडे लावा झाडे जगवा मग आपलं जीवन वाचेल

**रामेश्र्वर पाटील घोळसगाव**

पान १ वरुन

## नरेंद्र मोदी सरकारमुळेच ..

मला पटल्या नाहीत त्याबाबत मी २०१९ च्या सभेत स्क्रीनवर दाखवून जाहीर विरोध केला होता. काही गोष्टी मला पटल्या. पण काही गोष्टी पटल्या नाहीत. आजही नाही पटत. आणि मला असं वाटतं की या बाबतीत आपण मोकळं असणं गरजेचं आहे. या गोष्टी पटलेली नाही. या गोष्टी पटल्या. मग नोटबंदीची असेल. पुतळ्यांची असेल. अनेक गोष्टींची असेल. ज्या गोष्टी पटल्या नाहीत त्या नाहीच पटल्या. ज्या पटल्या त्यांचं जाहीर कौतुक करणारा माणूस मी आहे.नरेंद्र मोदींचं सरकार आणि त्याकाळतलं सुप्रिम कोर्ट यांच्यामुळेच राम मंदिर उभं राहिलं आणि कारसेवकांच्या आत्म्याला शांती मिळाली, असंही राज ठाकरे यावेळी म्हणाले. मित्राचीही खरडपट्टी काढायला आपण मागे पुढे पाहता कामा नये आणि दुश्मनाची स्तुती करताना मागे पुढे पाहू नये, असंही राज ठाकरे म्हणाले.

एकतर तुम्ही मोदींच्या बाजूने असता किंवा विरोधात असता. मी २०१९ ला जे बोललो आहे ते आजच्या विरोधी पक्षांत बोलायची हिंमत नाही. माझा हेतू स्पष्ट होता, उद्देश पारदर्शी होता. जर समजा अडीच वर्षाचं मुख्यमंत्री पद भाजपाने मान्य केलं असतं तर आज बोलला असतात का हे, असा प्रश्र्नही त्यांनी उद्धव ठाकरेंना विचारला. जे आज बोलत आहात ते बोलला असतात का. कारण सत्तेचा बोळा कोंबला असता. ती गोष्ट हिरावून घेतली म्हणून आग लागली, अशीही टीका त्यांनी केली.

२०१४ ते २०१९ मध्ये सत्तेत बसला होतात. २०१९ ते २०२२ पर्यंत मुख्यमंत्री होतात. महाराष्ट्रात साडेसात वर्षे उद्धव ठाकरे सत्तेत होते. मग उद्योगधंदे का गेले बाहेर? यांचा खासदार विरोध करणार आणि आमदार पाठिंबा देणार. आपण का विरोध करतो ते तरी माहितेय का? असा प्रश्र्नही त्यांनी विचारला.

## सोलापूर महापालिका हद्दीतील..

कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होत आहे. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात वाढत्या उष्णतेमुळे मतदानाचे प्रमाण कमी झाल्याचा अंदाज आल्याने सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सावलीची व्यवस्था केली जात आहे. त्याप्रमाणेच सोलापूर महानगरपालिका हद्दीतील ७७२ मतदान केंद्रावर व्हील चेअर, रॅम्पची व्यवस्था, मतदान केंद्राची आतील व बाहेरील परिसराची स्वच्छता, शौचालयाची स्वच्छता सह अन्य सर्व सोयी सुविधा प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तरी सोलापूर शहरातील सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर येऊन मतदान करावे. प्रत्येक मतदान केंद्रावर जेष्ठ मतदारांच्या व दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी व्हील चेअर ची सुविधा देण्यात आली असून त्यांच्या मदतीसाठी स्वयंसेवक ही नियुक्त करण्यात आले आहे. त्याप्रमाणे मतदान केंद्रावर रॅम्पचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतदारांसाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मदत कक्ष उघडण्यात येणार आहे, त्या ठिकाणी बी. एल.ओ. ची नियुक्ती केलेली आहे. मतदारांच्या आरोग्यासाठी प्रत्येक मतदार केंद्रावर स्वच्छतागृह स्वच्छ करण्यात आलेले आहेत. मतदारांना हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाच व पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र आहेत अशा ठिकाणी प्रत्येक मतदान केंद्राला कलर कोडींग चा वापर केलेला असून मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधणे अत्यंत सुलभ करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी देऊन सर्व मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

## मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी..

उन्हाची तीव्रता लक्षात घेता मतदारांना मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, शुद्ध पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांना व्हील चेअर, मतदान केंद्रात रॅम्प, ओआरएस पाकिटे, वैद्यकीय सुविधा, हिरकणी कक्ष, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, स्वतंत्र प्रसाधनगृह, पुरेशी प्रकाश व्यवस्था आदीबाबी उपलब्ध राहणार आहेत. मतदारांना आपले मतदानाचे केंद्र, मतदार यादीतील क्रमांक आदि माहिती सुलभरित्या उपलब्ध होण्यासाठी बीएलओ मार्फत घरोघरी मतदार चिठ्ठ्या वाटप केल्या आहेत. तसेच एकाच ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी मदतीसाठी स्वयंसेवक असणार आहेत. माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून नेमण्यात येणार असून, मतदारांचे नाव कोणत्या मतदार यादीत आहे. त्यांचे मतदान केंद्र कोणते याची माहिती हे स्वयंसेवक देणार आहेत.

लोकशाही मजबूत बनविण्यासाठी आपण मतदान करणे गरजेचे आहे. मत आपला अधिकार आहे तशीच आपली जबाबदारी देखील आहे म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजवावा व जास्तीत-जास्त मतदारांनी मतदान करावे असे आवाहनही सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## जेडीएसचे नेते एचडी रेवण्णा..

तपास करण्यासाठी कर्नाटक सरकारकडून विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. यानंतर प्रज्ज्वल रेवण्णा यांचा आणि त्यांच्यावरील आरोपासंदर्भातील काही माहितीचा शोध घेण्यासाठी एसआयटीचे पथक प्रज्ज्वल रेवण्णा यांच्या बंगळुरू येथील घरी पोहोचले होते.दरम्यान, एफआयआरनुसार, सदर घटना २९ एप्रिलची आहे. बेपत्ता झालेली महिला ही एचडी रेवण्णा यांच्या होलेनारसिपुरा येथे असलेल्या फार्महाऊसवर घरकाम करत होती. गेल्या सहा वर्षांपासून सदर महिला रेवण्णा यांच्या घरी काम करत होती, असे एफआयआरमध्ये म्हटले आहे.

सेक्स स्कँडल प्रकरणाचे आरोप असलेले प्रज्ज्वल रेवण्णा यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. लैंगिक अत्याचाराचे आरोप समोर आल्यानंतर प्रज्ज्वल रेवण्णा हे परदेशात फरार झाल्यानंतर आता केंद्रीय तपास यंत्रणा अलर्ट झाल्यानंतर प्रज्ज्वल रेवण्णा यांच्याविरोधात ब्लू कॉर्नर नोटीस काढली जाण्याची शक्यता आहे.

## कर दहशतवाद नष्ट..

हे सरकार पाडून टाकायला हवे. तुम्ही हे सरकार उलथवून टाका, कांद्याची निर्यात बंदी कायमची दूर करण्याची जबाबदारी माझी आहे. इंडिया आघाडीचे सरकार देशात येणार आहे. घरगड्याप्रमाणे सगळ्या शासकीय यंत्रणा वापरणाऱ्यांना आपण वठणीवर आणल्याशिवाय राहणार नसल्याचा इशाराही उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.

नरेंद्र मोदी यांना आपल्याविषयी प्रेम असल्याचे ऐकून आनंद झाला. मलाही त्यांच्याविषयी मनात प्रेम आहे. मात्र ज्यावेळी आपल्यावर शस्त्रक्रिया झाली होती त्यावेळी महाराष्ट्रातील सरकार पाडण्याचे षडयंत्र करणाऱ्या मोदींच्या चेल्याचपाट्यांना या प्रेमाची जाणीव नव्हती का ? असा सवालही ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.मशाल चिन्ह घेऊन आपण रणांगणात उतरलो आहोत. आपल्या सगळ्यांच्या आशीर्वाद घेऊन मशालीच्या माध्यमातून दिल्लीचे तक्त जाळून टाकल्याशिवाय आपण स्वस्थ राहणार नाही. नरेंद्र मोदी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब यांचे कर्ज मान्य करत असतील तर त्याच बाळासाहेबांच्या खोलीत अमित शहा यांनी दिलेले वचन मोदींना माहीत नव्हते काय ? असा सवालही ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

आज मोदींवर गॅरंटी म्हणून महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि गल्लीबोळात फिरण्याची वेळ आली आहे. तरुणांच्या हाताला रोजगार नाही, शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, सर्वांना हक्काचे घर देणार होते तेही खोटे ठरले. त्यामुळे गॅरंटीच्या नावावर खोटे कोण बोलत आहे हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळेच मी केंद्रातल्या सरकारला मोदी सरकार नव्हे तर गजनी सरकार म्हणून संबोधतो, कारण मागील निवडणुकीत कोणते वचन दिले होते हेही यांना आठवत नाही. गोमूत्रदारी हिंदुत्व, बुरसटलेले हिंदुत्व अंगिकारणारी ही मंडळी यांना आंबेडकरांनी दिलेले संविधान मान्य नाही. त्यामुळेच त्यांचा त्रागा सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या माध्यमातून, विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणला जात आहे. याद राखा इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर गाठ आमच्याशी आहे अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी यावेळी शासकीय यंत्रणांनाही सज्जड दम दिला.

चाय पे चर्चा करण्याची मोदींना मोठी हौस आहे त्यापेक्षा यंत्रणा वापरून दरोडे घालण्यात मश्गुल असलेल्या केंद्र सरकारने स्वतःच्या कामावर चर्चा करावी. मागील अडीच वर्षात आपण केलेल्या कामांमुळे महाराष्ट्रातील जनता आज खंबीरपणे आपल्या पाठीशी उभी आहे आणि या निवडणुकीत त्याचा प्रत्यय आल्याखेरीज राहणार नाही. मोठ्या मताधिक्याने मशाल चिन्हासमोरील बटन दाबून ओम राजेनिंबाळकर यांना विजयी करा असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केले.

## देशातील लोकशाही संपवण..

कारखान्यातदारांना धमक्या दिल्या जातात त्यांच्यावर कारवाईचा भडगाव वरला जातो कारवाईच्या भीतीने नेते घरात आहेत तर जनता रस्त्यावर उतरली आहे आणि हीच जनता यंदा महाराष्ट्रात परिवर्तन घडवले शिवाय राहणार नाही

धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले म्हाडा लोकसभा मतदारसंघातील सिंचनाचा प्रश्र्न सोडवायचा आहे शेतकरी पाणीदार करायचा आहे फलटण पंढरपूर रत्नागिरी कराड पंढरपूर रेल्वे मार्ग सुरू करण्याचा आहे केळी संशोधन केंद्र सुरू करायचे आहे निराहुवा कालव्याची पूर्वीप्रमाणे नियोजन करायचे आहे सोलापूर सातारा जिल्ह्यातील स्वाभिमानासाठी मी रात्रंदिवस भेटेल. उत्तमराव जानकर म्हणाले की ७७ हजारांच्या घोटाळ्यातील कावळ्याला चुना लावून बळा करण्याची काम भाजपने केले आहे त्यांनी चंद्र सूर्य सोडून सर्व काही देण्याची आश्र्वासन मला दिले परंतु गेल्या दहा वर्षात त्यांनी मला इतकी फसवले की माझ्या त्यांच्यावर विश्र्वास राहिला नाही म्हणून मी विमानाने उडी टाकून पवार साहेबांना भेटलो आता माळी खासदारकी पवार साहेबांच्या पायावर घालूनच थांबेल राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील माजी मंत्री राजेश टोपे भूषण सिंह होळकर युवक अध्यक्ष महबूब शेख माजी आमदार आरजी रुपनर काकासाहेब साठे मोहिते पाटील डॉ बाबासाहेब देशमुख डॉ अनिकेत देशमुख नितेश कराळे नगराध्यक्ष मिलन साठी बाळासाहेब धनंजय संजय पाटील घाटणेकर साईनाथ अभंगराव नामदेव वाघमारे यांच्याशी हजारो नागरिक मोठ्या संख्येने सभेत उपस्थित होते

# करंजी खुर्द येथे तुकोजीराव होळकर जयंती साजरी

**निफाड/प्रतिनिधी**

धर्म रक्षक राजमाता अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव समिती नाशिक यांच्यावतीने निफाड तालुक्यातील करंजी खुर्द येथे तुकोजीराव होळकर यांची द्वितीय जयंती ३ मे रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी नाशिक येथील आनंद ठाकूर यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर व तुकोजी होळकर यांच्यासमोर शास्त्राने प्रात्यक्षिक करून मानवंदना दिली याप्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते रामदास काळे यांचे तुकोजीराव होळकर यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान झाले, तुकेश्र्वर महादेवास निफाड येथिल श्रीमंत नानासाहेब होळकर यांच्या हस्ते सपत्नीक अभिषेक करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अहिल्यादेवी



होळकर यांचे वंशज श्रीमंत नानासाहेब होळकर राजे यांनी भूषवले त्यांच्या समवेत समितीचे अध्यक्ष समाधान भाऊ बागल, अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज निफाड नगरपंचायत माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर राज घराण्यातील सुशीलाबाई होळकर मनमाड येथील मच्छिंद्र भाऊ बिडगर श्रीमंत भाऊसाहेब राजोळे तसेच निफाड येथील नइमभाई पठाण, सुहास सुरळीकर, जयेश जगताप ,दत्ता आरोटे, श्याम गोसावी, वैभव रोकडे ,ज्ञानेश्र्वर ढेपले ,विनायक काळदाते, खंडू कोटकर, करंजी खुर्द येथील ग्रामस्थ प्रकाश आडसरे, बंडू आडसरे ,शरद जोशी ,राजभाऊ जगदाळे गावातील विविध मान्यवर या ठिकाणी उपस्थित होते सूत्रसंचालन नांदूर मधमेश्र्वर येथील वसंत पानसरे यांनी केले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पत्रकार यांच्यामुळेच लोकशाही जीवंत ठेवून समाजाला सजग करतात

**गोंदिया/यश सिध्दि न्यूज**

पत्रकार हा समाजाचा आरसा आहे. पत्रकार हे समाजातील समस्या व अडचणी सोडविण्यासाठी अविरत कार्य करतात. पत्रकार यांच्यामुळे अनेक बाबी व पैलू ह्या सकारात्मक केल्या जातात. सर्व क्षेत्राचा आढावा आणि अनुभव घेऊन बातमी तयार करावी. समाजाला व देशाला यांनी सतत तत्परतेने जागृत करण्याचे काम केले आहे.

लोकशाहीचे चौथ्या स्तंभ म्हणून लोकशाहीला जीवंत ठेवून समाजाला सजग करतात. असे प्रतिपादन नमाद महाविद्यालय गोंदियाचे प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांनी केले आहे. त्या पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी मंचावर प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख पाहुणे:- मा.संजय राऊत, दैनिक लोकसत्ता मा.कैलाश गजभिये ,उपसंपादक जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय गोंदिया मा.हरिष मोटघरे,जी.बी.वृत्तवाहिनी मा.जयंतजी शुक्ला, दैनिक लोकशाही वार्ता जिल्हा प्रतिनिधी मा.अपूर्व मेठी, दैनिक हितवाद जिल्हा प्रतिनिधी मा. आकाश वालदे, न्युज मराठी मा.रवी सपाटे, न्युज १८ लोकमत मा.देवेंद्र रहांगडाले,ABP माझा मा.अमित गुप्ता,जी.बी.न्युज मा.नवीन दहीकर, टाईम्स नाऊ मा.सावन डोये, दैनिक नवराष्ट्र मराठी मा.मुनेश्वर कुकडे,दैनिक सकाळ जिल्हा प्रतिनिधी मा.संजीव बापट,दैनिक जनप्रेरणा मा.महेंद्र लिल्हारे, न्युज प्रभात आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेला माला अर्पण करून सर्व मान्यवरांनी



अभिवादन करण्यात आले. मंचावरील सर्व पाहुण्यांचे सन्मान चिन्ह व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आले. त्याबरोबर मागील सत्र २०२२-२३ उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांना पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांचे पत्रकारिता क्षेत्राबद्दल मनोगत व्यक्त करताना मुन्नाभाई नंदागवळी, कृतीका कनोजिया, मिथीलेस मेहर व गजाला शेख यांनी आपले विचार मांडले.

त्यानंतर अनेक मान्यवरांनी आपापले अनुभव सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डा.बबन मेश्राम यांनी मांडले तसेच सूत्रसंचालन प्रदीप ढवळे यांनी केले तर आभार हिना लांजेवार हिने मानले. तर यशस्वीतेसाठी इशा सातभावे, मुन्नाभाई नंदागवळी, प्रणाली बंसोड, स्नेहा डोंगरे, प्राची बरोले, आर्या चव्हाण, सोनल यादव राधिका मेंढे, ओम पारमार, देवेंद्र दमाहे सौरभ ठाकरे नरेश बोपचे मनीष ठाकरे विनय मेंढे प्रफुल उके आयुष उपरीकर निकिता उके हर्षु बावनकर सुहानी ठाकरे कृतिका कनोजिया शारदा नागरिकर रवींद्र कावळे सुशील गौतम मनीष दहिकर उमेश बनसोड शुभम बोरकर सायली ठाकूर पल्लवी पटले सचिन बनसोड सोनाल यादव यांनी परिश्रम घेतले.

पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रमाणपत्र वाटप

निखिल बनसोड ,अजित रहांडाले, अंकेश रामटेके, शिवानी हाडगे ,रत्नदीप कांबळे ,ओम परमार ,गजाला शेख ,भूमेश्वर खोब्रागडे मिथिलेश मेहर ,शिवम बहेलिया हर्ष बेगड अनुप हरिणखेडे वैशाली हलमारे अंचल पटले निकिता वासनिक पल्लवी शहारे प्रणाली मेश्राम ममता नाईक प्रतीक्षा बोरकर रामसिंग बघेले प्रज्वल चौरे सतीश पाचे पुनम वाघाडे कार्तिक हेमने ज्ञानेश्वरी सुलाखे आदी उत्तीर्ण झाले.



# टाकळीवाडीत पाण्याअभावी पिके धोक्यात शेतकरी संकटात

**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी तालुका शिरोळ या गावाला नदी नाही. सध्या दिवसेंदिवस तापमानामध्ये वाढ होत आहे. काहीजणांचे बोर,विहिरी, चे पाणी बंद पडलेले आहेत. शेतकरी संकटात सापडलेला आहे. शक्यतो टाकळीवाडी ला शेती मुरमाड शेती जास्त असल्यामुळे पाण्याची फार आवश्यकता असते. पाण्याचे नियोजन होत नाही.दिवसाचा रात्र करून शेतकरी मिळेल तसं पिकाला पाणी उभा राहून पाजत आहे. काही शेतकऱ्यांची पिके करपलेली आहेत. काही शेतकऱ्यांची पिके करपत आहेत. फार भयानक परिस्थिती उद्भवलेली आहे.वळीव पावसाची अपेक्षा शेतकरी करत आहे. शेतकऱ्याबरोबर पिकांनी सुद्धा आशा सोडलेली आहे. यातच दूधगंगा नदीचे पात्र कोरडे पडलेले आहे. सर्व शेतकरी पावसाची अपेक्षा करत आहेत.

# राष्ट्रवादीचे नेते व्यापार व उद्योग सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्यावर जबाबदारी वाढली

**पंढरपूर/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे पंढरपूर भागातील विश्वास शिलेदार असलेली राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष आणि सहकार्य सहकारी साखर कारखाने संचालक नागेश पाटील चव्हाण मोठी जबाबदारी वाढली आहे

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्व असलेली नागेश फाटे हे आज माळशिरस तालुक्यातील खासदार चंद्र पवार यांच्या सभेसाठी गेले होते त्या ठिकाणी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील ही उपस्थित होते सहभाग क्षमताच पाटील यांनी नागेश फाटे यांना आपल्या सोबत घेऊन थेट हेलिकॉप्टरने आटपाडी पर्यंत प्रवासात सोबत घेतले व मतदार संघातील सर्व परिस्थितीची माहिती ही जाणून घेतली आहे त्यामुळे राष्ट्रवादीत यापुढे नागेश पाटील यांचे वजन वाढले आहे यासोबत घडलेल्या प्रवासाबाबत नागेश पाटील यांनी विचारले असता त्यांनी आपली प्रतिक्रिया देताना सांगितली की आज माझ्या नेत्यासोबतचा हेलिकॉप्टर प्रवास हा एक वेगळीच अनुभवती देणार आहे काम करणे दुर्मिद आणि प्रेरणा वेळोवेळी अनुभवायला मिळते साहेबांसोबत या सव्वा सात माढा लोकसभा मतदारसंघातील जाहीर सभा संपून पुढील प्रचार दौऱ्यासाठी निवडणूक माळशिरस ते आटपाडी सांगली येथे जाताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील साहेब यांच्यासोबत हेलिकॉप्टर प्रवास करण्याची संधी मिळाली



प्रवासादरम्यान अध्यक्ष साहेबांच्या खांद्याला खांदा लावून पक्षी संघटनेचे काम करावे लागेल याची जाणीव मला झाली यापुढे अजून चांगले काम संपूर्ण महाराष्ट्रभर करावे लागणार लोकसभेच्या अजून पुढील टप्प्यातील निवडणुका दौऱ्याबद्दल साहेबांनी माहिती घेतली व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या!

# पंढरपूर येथील कॉर्नर सभेला आ.प्रणिती शिंदे यांना मतदारांचा उदंड प्रतिसाद

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहरातील कालिका देवी चौकात वर्णन सभा पार पडली यावेळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले

व भाजपच्या सत्ते सर्वसामान्य जनतेचे शेतकरी झाला आहे खते मागले आहेत बियाणे माहिती आहेत महागाईने तर कंबर मोडला आहे

आता या सरकारला आपल्याला मतदारसंघातून धडा शिकवायचा आहे यांना सत्तेतून खाली खेचण्यासाठी काँग्रेसला भरभरून मतदान करा असे आव्हान याप्रसंगी बोलताना केले याप्रसंगी भगीरथ




दादा भालके यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरपूर शहरातील डोंबिवली येथे कॉर्नर सभा पार पडली पंढरपूरची क्षेत्राच्या विकासासाठी यावेळेस काँग्रेसला निवडून द्या तीर्थक्षेत्रासह आपले प्रश्न आणि समस्या सोडवण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न करीन असे आश्वासन यावेळी बोलताना केली याप्रसंगी भगीरथ दादा भालके यांच्यासह महायुकोसागढतील नेते पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. ०६ मे २०२४ सकाळी ०८ वा.पासुन ते दि .२० मे २०२४ रात्री ०८ वा.पर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ति अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजावितांना उपरनिर्दिष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

# श्री विठ्ठल रुक्मिणी गाभारा संवर्धन काम महिना अखेर पूर्ण होणार : गहिनीनाथ महाराज औसेकर

## मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांची पुरातत्व विभागा सोबत पाहणी व आढावा बैठक

**पंढरपूर/प्रतिनिधीः**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम १५ मार्चपासून सुरू करण्यात आले आहे. सदरचे काम ४५ दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. तथापि, कामास सुरुवात केल्यानंतर अनेक प्रकारची नव्याने दुरुस्ती करण्याचे निदर्शनास आल्याने , माहे मे २०२४ अखेर सदरचे काम पूर्ण करून भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन पूर्वत करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह.अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज यांनी दिली.आज दि.४ मे रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सर्व सदस्य यांनी पुरातत्त्व विभाग, वास्तुविशारद व ठेकेदार यांच्या समवेत गाभाऱ्याची पाहणी करण्यात आली. तदनंतर सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात बैठक घेण्यात आली. तसेच गाभारा संवर्धन कामाबाबत आढावा घेण्यात आला.



यावेळी सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी महाराज, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, दूरदृष्यप्रणालीद्वारे अतुलशास्त्री भगरे गुरुजी तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, ठेकेदार रमेश येवले व बांधकाम विभाग प्रमुख बलभीम पावले उपस्थित होते.

यावेळी सह. अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज म्हणाले, श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम करतेवेळी मूर्तीच्या संरक्षणास कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही, याची दक्षता घेणे व मूर्ती संरक्षणास प्राधान्य देणे गरजेचे आहे. गाभाऱ्यातील फरशी काढल्यानंतर काही नव्याने कामाच्या बाबी निदर्शनास आल्यामुळे व काम दर्जेदार व पुढील अनेक वर्ष टिकेल या दृष्टीने काम करण्यात येत आहे. सदरचे काम माहे मे, २०२४ अखेर पूर्ण करण्यात येत आहे. काम पूर्ण झाल्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन पूर्ववत करण्यात येईल, तोपर्यंत सध्या सुरू असणारी दर्शनी व्यवस्था कायम ठेवण्यात येणार आहे.

श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाच्या कामांबाबत पुढील १५ दिवसात मंदिर समिती, सल्लागार परिषद, वारकरी प्रतिनिधी, पत्रकार, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समवेत जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.सदर कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई झालेली नाही, कामे दर्जेदार व मूर्तीचे संरक्षण करून करावयाची असल्याने वारकरी भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

# महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील याना रिपाइं (आठवले) कडून विजयी मताधिक्य मिळेल

## नळदुर्ग येथील बैठकीत कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आत्मविश्वास

**वागदरी/एस.के.गायकवाड**

कोणाच्या ही मानापाणाची अपेक्षा न करता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री भारत सरकार नामदार रामदास आठवले यांच्या प्रमुख पुढाकाराने उदयास आलेल्या महायुतीच्या उमेदवार सौ.आर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांना विजयी मताधिक्य मिळवून देण्यासाठी जाणिव पुर्वक रिपाइं (आठवले) कार्यकर्ते काम करत असून त्यामुळे सौ.आर्चनाताई पाटील याना विजयी मताधिक्य नक्की मिळेल असा आत्मविश्वास नळदुर्ग ता.तुळजापूर येथे रिपाइं कार्यकर्त्यांनी आयोजित बैठकीत व्यक्त केला.

उस्मानाबाद लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार सौ.अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे रिपाइंच्या प्रमुख पदाधिकारी यांची बैठक रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या प्रसंगी महायुतीचे उमेदवार किंवा भाजप व घटक पक्षांचे पदाधिकारी रिपाइं कार्यकर्त्यांना म्हणावं तसं विश्वासात घेत नाहीत असी खंत व्यक्त करीत केवळ आणि



केवळ नामदार रामदास आठवले यांचा आदेश शिरसावंद्य मानून त्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचा धर्म पाळत रिपब्लिकन कार्यकर्ते सौ.आर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ काम करण्याचा मनाचा मोठेपणा दाखविलाआहे.यावेळी रिपाइं (आठवले)चे जिल्हा सचिव एस.के.गायकवा, नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, तालुका युवा आघाडी सचिव सागर सुरवसे दहिटणा शाखा प्रमुख उमेश कांबळे सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# बौद्धजन पंचायत समिती अंतर्गत विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव संपन्न




**मुंबई/प्रतिनिधी**

बौद्धजन पंचायत समिती अंतर्गत गोरेगाव गट क्रं.२७ सर्व शाखा व महिला मंडळ तसेच समन्वय समितीच्या विद्यमाने नुकताच केशव गोरे स्मारक ट्रस्ट, अ.भि.गोरेगाव हायस्कूल समोर,अंबामाता मंदिरा शेजारी, आरे रोड,गोरेगाव पश्रि्चम,मुंबई १०४ येथे विश्र्वरत्न,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या आयोजित कार्यक्रमात सुरवातीला कवी , गायक आणि कोकणरत्न पुरस्कार प्राप्त मंगेश जाधव आणि पार्टी यांच्या भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला. सदर वेळी जाहीर सभेचे आजोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपद गटाचे विद्यमान गट प्रतिनिधी व पंचायत समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे यांनी भूषवले. विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, गटाचे माजी गट प्रतिनिधी तुळशीराम शिर्के बौ.पं. समितीचे खजिनदार नागसेन गमरे,समितीचे चिटणीस श्रीधर साळवी , रवींद्र शिंदे , रोहन शिंदे , बद्धाचार्य नारायण जाधव,आणि पत्रकार मेघना सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते . यावेळी पंचायत समितीला वेळोवेळी सहकार्य करणाऱ्या बौ.पं. समिती शाखा क्र. ५७,२३३,३२१, ३३१, ३४४, ३५०, ३८५, ४३४,४८५, ५२०.,६२१, ३६२ तसेच धम्म शिला महिला मंडळ,पंचशील महिला मंडळ,यशोधरा महिला मंडळ,विशाखा महिला मंडळ,भिमाई महिला मंडळ,गौतमी महिला मंडळ,सावित्री बाई फुले महिला मंडळ,रमाई महिला,सुजिता महिला मंडळ, शाखा क्रं.५७.महिला मंडळ,शाखा क्र.६२१.महिला मंडळ,शाखा क्र.६३२ महिला मंडळ यांच्या सदस्य , पदाधिकारी त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थतीत मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमात समन्व्य समितीचे माजी अध्यक्ष प्रकाश कांबळे आणि समन्वय समितीचे उपकार्याध्यक्ष आत्माराम मोहिते हे स्वागताध्यक्ष पदी होत.कार्यक्रमाची प्रास्ताविका कार्याध्यक्ष संदीप लाखन यांनी सादर केली असून सूत्रसंचालन समन्वय समितीचे सरचिटणीस शिवाजी मोहिते यांनी केले.शेवटी समन्वय समितीचे उप कार्याध्यक्ष प्रबोध मोहिते आभार प्रदर्शन करून सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शाखेतील पदाधिकारी,सदस्य तसेच महिला मंडळ व समन्वय समितीचे सर्व आजी माजी कार्यकत्यांनी तन मन धन देवून अपार परिश्रम घेतले ..आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानून अल्पोआहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

# गरीबाच्या तक्रारीवर का होते दिरंगाई... पैसेवाले ठेकेदारांवर होईल का कारवाई...

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

तालुका प्रतिनिधी/ गौरवकुमार इंगळे

त्या अपघात ग्रस्त मजुरावर अद्याप दुर्लक्षच. मजुराची माऊली दारोदार भटकली यंत्रणेने मात्र जबाबदारी झटकली

**न्याय कोण देणार?** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत जल जीवन मिशन चा उपक्रम मंगरूळपीर तालुक्यातील शहापूर सोनखास या गट ग्रामपंचायत मध्ये सुरू आहे. या उपक्रमांतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करून या ठिकाणी पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे व सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पावर काम करण्याकरीता कंत्राटदार यंत्रणेने बाहेर जिल्ह्यातून मजूर बोलावले.त्यांचे माध्यमातून काम सुरू केले. काम सुरू असताना दुर्दैवाने २४ फेब्रुवारी २०२४ रोजी पाण्याच्या टाकीच्या संबंधीत एका युनिटचे बांधकाम सुरू असताना ताकीब खान नामक एक मजूर वय २० ,उंचीच्या ठिकाणावरून पाय घसरून खाली पडला त्याचे डोक्याला व हाताला जबर मार लागल्याने त्याला ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर व तेथून पुढे जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला व तेथून पुढे सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नागपूर या ठिकाणी पुढील उपचारासाठी नेण्यात आले. सदर




मजुरावर दोन शस्त्रक्रिया पार पडल्या. प्रशासन व कंत्राटदार यांचे कडून कुठलीही ठोस मदत या कुटुंबाला आजवर झाली नाही. या संदर्भामध्ये १८ एप्रिल २०२४ रोजी वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच जिल्हा कामगार अधिकारी वाशिम यांच्याकडे रीतसर तक्रार नोंदवल्यानंतरही आजवर त्या तक्रारीवर कुणीही लक्ष दिले नाही. या अपघात ग्रस्त मजुराच्या परिवाराला विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी यशस्वी दैनिकाने सदर घटनेची दखल घेत आपल्या वृत्तपत्रांमध्ये बातमी सुद्धा छापली होती परंतु उन्मत्त झालेले लालची ठेकेदार तसेच मजुरांच्या जीवन मरणाप्रती उदासीन असलेले प्रशासन यावर अद्यापही दुर्लक्ष करीत आहे. यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता यांना जाब विचारले असता मजुरांना विमा मिळवून देणे हे ठेकेदारांचे काम आहे ते आमचे काम नाही असे सांगत विषयाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. मस्तवाल झालेले ठेकेदार हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर प्रशासकीय यंत्रणेचे वरिष्ठ असल्याचा भास होत आहे. प्रशासन ठेकेदाराला जाब का विचारू शकत नाही नेमके प्रशासनाचे हात कुठे दबले आहे. एखाद्या मजुराला इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये शारीरिक हानी झाल्यानंतरही त्याच्या तक्रारीवर प्रशासन नेमके दुर्लक्ष का करत आहे अशा अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. मात्र आपल्या अपघातग्रस्त मुलाला घेऊन त्या मजुराचा परिवार दवाखान्यांमध्ये भटकत आहे व अद्यापही शासनाकडून आर्थिक मदतीची वाट बघत आहे. परंतु भर उन्हाळयात वातानुकूलित कार्यालयातून काम बघणाऱ्या अधिकारी वर्गाला याची जाणीव होत नाही, हे नवलच.

# 'जब तक सुरज चांद रहेगा बाबा आपका संविधान रहेगा' असा नारा पंतप्रधान नरेंद्र मोदीनी दिला



**वळसंग/प्रतिनिधी:**

समोर पराभव दिसत असल्याने आणि कुठलाही विकासाभीमुख अजेंडा नसल्याने भारतीय संविधाना संदर्भात संभ्रम निर्माण करण्याचे काम काँग्रेस करत असून त्यांच्या या भुलताप्यास कोणीही बळी पडणार नसून काँग्रेस नेत्याने दलितांच्या मतावरती अनेक पदे उपभोगली पण दलिताचा वापर फक्त मतापुरता करून स्वतःचा स्वार्थ साधून घेतला असल्याचे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आनंद दादा चंदनशिवे यांनी व्यक्त केले

वळसंग येथे भाजप महायुतीचे उमेदवार रामभाऊ सातपुते यांच्या प्रचारार्थ भव्य कॉर्नर सभा घेण्यात आले. यावेळी भाजप अनु. जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे,माजी नगरसेवक गणेश पुजारी, माजी सरपंच मलकप्पा कोडले, अविनाश भडकुंबे, रमेश व्हनकडे, चाचा सोनवणे, रवी कोडले,परमेश्र्वर गायकवाड,अक्षय गायकवाड, सिद्धाराम वाघमारे, शांतकुमार गायकवाड आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना चंदनशिवे म्हणाले की दलित समाजाने काँग्रेसच्या पाठीशी खंबीर उभे राहून मतदान केले असताना सुद्धा गेल्या पन्नास वर्षात समाजाचा कुठलाच प्रश्न सोडवला नाही आमचं श्रद्धास्थान असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्घाटन केलेल्या ऐतिहासिक विहिरी कडे काँग्रेसच्या कोणत्याही आमदार,खासदार, पदाधिकाऱ्यांनी निधी तर दिलाच नाही व जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले परंतु भाजप जिल्हाध्यक्ष आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी आम्ही मागणी केला असता कसलाही विलंब न लावता ऐतिहासिक विहिरीवरील स्तूप स्मारकास भरघोस निधी दिला व पुढे कधीही निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही दिली, आणि दोन महिन्यापूर्वी कामाचे भूमिपूजन करून कामास सुरुवातही केले. जे काम काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याला जमलं नाही ते काम आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी तात्काळ केलं. मतदारसंघात दलिताच्या प्रश्नाकडे आवर्जून लक्ष देणारा पहिला आमदार म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या रूपाने लाभला असल्याचे सांगितले व यापुढेही आपल्या समाजाला कुठल्याही प्रकारची निधी आमदार कल्याणशेट्टी यांच्याकडून कमी पडणार नसल्याचे सांगितले.

सोलापूर भाजप अनु जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे यांनी दहा वर्षात सोलापूरात मोदी सरकारने जे काम केलं आहे

त्याच्या २५ टक्के काम देखील सुशील कुमार शिंदे यांनी त्यांच्या चाळीस पन्नास वर्षाच्या कारकिर्दीत केला नसल्याचे सांगितले. यावेळी सिद्धाराम वाघमारे यांनी वळसांग भीम नगर मधून भाजप उमेदवार रामभाऊ सातपुते यांना मोठा मताधिक्य मिळेल अशी ग्वाही दिली. प्रास्ताविक व आभार शांत कुमार गायकवाड यांनी केले.

## पंढरपूर सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघ

# महाराष्ट्र नवनिर्माण सेना आयोजित माहिती प्रमुख पदाधिकारी बैठक

**पंढरपूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार राम सातपुते आणि रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारासाठी पंढरपूर शहर व तालुक्यातील माहितीच्या विविध घटक पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पंढरपूर शहरातील हॉटेल विठ्ठल इन येती आयोजित केली होती या बैठकीमध्ये माहितीचे दोन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला माहिती सर्वच पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्ते यांनी दोन्ही मतदार संघातील प्रत्येक घरोघरी जाऊन महायुतीच्या दोन्ही उमेदवाराचा प्रचार करणार आहेत. यावेळी मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य प्राध्यापक चव्हाण देव कांबळे शिवसेनेचे संपर्कप्रमुख महेश नाना साठे राष्ट्रवादी प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष काशिनाथ थिटे बाबासाहेब बडवे, सुरेश खटेकर सरचिटणीस बादल ठाकूर भारतीय जनता पार्टीचे महिला जिल्हाध्यक्ष प्राजक्ता बेनारी मनसेची तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील विधानसभा अध्यक्ष अनिल बागल शहराध्यक्ष संतोष कवडे यांची शेर संघटक गणेश पिंपळनेर मनसेचे उपजिल्हाध्यक्ष सिद्धेश्र्वर गरड मनसे विद्यार्थी सेना



तालुकाध्यक्ष प्रताप भोसले शहराध्यक्ष अवधूत गडकरी मनसेचे विभाग अध्यक्ष नागेश इंगोले मनसेचे सहकार सेना जिल्हाध्यक्ष कृष्णा मासा राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्ष वर्षाताई शिंदे आरपीआयच्या आठवणी गटाचे नगरसेवक दिरा सर्व आदित्य जोशी युवा सेना शहराध्यक्ष सुमित शिंदे विवेक देणारे महेश किस्ती राष्ट्रवादी शहराध्यक्ष दिगंबर सुडके संकेत ढवळे अमोल पर्वतराव युवक शहराध्यक्ष विद्यार्थी परिषद शहराध्यक्ष साधनाताई राऊत ओबीसी महिला अध्यक्ष उपजिल्हाप्रमुख विवाह सेना साईनाथ बडवे शहर संघटक युवासेना असंगी शहर प्रमुख युवा सेना मेहबूब नदा शहर उपप्रमुख युवा सेना आनंद शिंदे शहर उपप्रमुख युवा सेना गणेश चव्हाण युवा सेना कॉलेज कक्ष तालुकाध्यक्ष करण नागणेयुवा सेना तालुका अध्यक्ष विश्र्वजीत नाट्य ड्रॉप प्राजक्ता बेनारी जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा ग्रामीण बँक ज्योती शेटे शहराध्यक्ष भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा अर्पणा तारखे उपाध्यक्ष संस सुजता वगैरे उपाध्यक्ष जिल्हा कार्यकारणी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा सुप्रिया वाकडे जिल्हा सरचिटणीस सोशल मीडिया प्रमुख भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा सुनीता मुंडे सरचिटणीस जिल्हा कार्यकारणी महिला मोर्चा भारतीय जनता पार्टी अंजना जाधव सर पुणे जिल्हा कार्यक्रम महिला मोर्चा

सोशिल्पा मामाने उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पंढरपूर शहर सोम्यामुळे संघटक सरचिटणीस महिला मोर्चा पंढरपूर शहर भारतीय जनता पार्टीच्या सर्व महाराष्ट्र नवनिर्माण सेना भारतीय जनता पार्टी शिवसेना एकनाथ शिंदे गट राष्ट्रवादी अजित दादागड पवारगड लहुजी शक्ती सेना विविध माहितीच्या संघटनेत पदाधिकारी इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पंढरपुरात सो.क्ष.कासार समाजातर्फे श्री.कालीका देवी उत्सव मोठ्या थाटात संपन्न

## समाजाच्या सांघिक परिश्रमामुळे मिरवणुकीत मोठे यश

**पंढरपूर/प्रतिनिधी**

येथील सो.क्ष. कासार समाजाच्या वतीने श्री.कालीका देवी उत्सव मोठ्या थाटामाटात पार पडला. 'एक दिवस समाजासाठी' या आवाहनास प्रचंड प्रतिसाद देऊन पंढरपूर मधील सर्व समाज बांधव, भगिनी व जेष्ठ समाज बांधव उपस्थित राहून श्रींचा उत्सव यशस्वीरित्या साजरा केला. सकाळी ७ वा. श्री.कालीका मातेची महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्री.कालिकादेवी चौक पासून श्री.कालीका माता देवीच्या प्रतिमेची मिरवणूक निघाली. काळा मारुती, चौफाळा, नाथ चौक, घोंगडे गल्ली व कासार गल्ली येथे तडफदार वादनाने सारा आसमंत दणाणून गेला. मिरवणूकीच्या वेळी ठिकठिकाणी समाजबांधवांतर्फे सरबत, रसना, फ्रुटी, कुल्फी, कोकम वाटप करण्यात येत होते. यावेळी बारामती मधील नटराज बँजो पार्टीच्या वादनाने मिरवणुकीतील सर्व समाज बांधव, भगिनी व जेष्ठ समाज बांधव, महिला, मुली, युवकांचा उत्साह यात कुठेही कमी होत नव्हता. मिरवणुकीच्या माध्यमातून पंढरपूर करांना सामाजिक एकीचे दर्शन दिसून आले. श्री.कालिका मातेची भव्यदिव्य मिरवणूकीत सुरूवाती पासूनच समाजातील स्त्री पुरूषांची उपस्थिती लक्षणीय होती. महिला हया आकर्षक केसरी रंगाच्या जरदारी






साडीत आणि पुरुष हे पांढरे शुभ्र पेहराव व केसरी टोपी मध्ये भारदस्त वाटत होते. मिरवणूकी दरम्यान उन्हाची तमा न बाळगता सर्वजण मोठ्या उत्साहात व आनंदात सहभागी झाले होते. मिरवणूक जसजशी पुढे जात होती तशतशी मुले, महिला, जेष्ठ नागरिक, अबाल वृद्ध यांची संख्या वाढत होती.तसेच मिरवणूक मंदिरात आल्यावर सामुदायिक महाआरती करण्यात आली व त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर सर्व समाजबांधव भगिनींनी दुपारी मंदिरात महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी श्री कालिका महिला भजनी मंडळातर्फे सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम पार पडला, राष्ट्रीय पुरस्कार विजेते, सुप्रसिद्ध व्याख्याते, निसर्गोपचार तज्ञ श्री. स्वागत तोडकर यांच्या हसत-खेळत घरगुती उपचार पद्धतीने 'औषधाविना आरोग्य' कसे जगावे?' या विषयावर भव्य दिव्य अशा व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या सदाबहार वक्तृत्व शैलीतून नैसर्गिक उपचार पद्धती तसेच आपल्या व्यस्त जीवनशैलीतून नेहमी हसत खेळत राहून आपले जीवन आनंदी बनवू शकतो हा विश्र्वास त्यांनी उपस्थितांना दिला. 'जो हसतमुखी तो सदा सुखी' हा आरोग्याचा मूलमंत्रच त्यानी उपस्थितांना दिला, त्याचबरोबर विविध घरगुती नैसर्गिक उपचार पद्धतीने आपण औषधाविना आरोग्य जगू शकतो ही दृढभावना लोकांच्या मनात निर्माण केली. हजारोंच्या संख्येत उपस्थित समुदायानेही त्यांच्या उपयुक्त माहितीला भरभरून प्रतिसाद दिला. अशा प्रकारे अतिशय उत्साहात आणि आरोग्यमय वातावरणात संपन्न झाली. याला समाजबांधवांनी भरघोस प्रतिसाद दिला. श्री.कालिकामातेची गाभाऱ्यातील फुलांची आरास यामुळे मंदिरातील वातावरण अधिक प्रसन्न जाणवत होते. उत्सवाच्या आदल्या दिवशी म्हणजे दि. ३० एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत आयोजिलेल्या रक्तदान शिबिराला उस्फुर्त सहकार्य मिळाले. यामध्ये समाजबांधव व मित्रमंडळी यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. हा उत्सव यशस्वी होण्यासाठी श्री.कालीका देवी संस्थांनचे कार्यकारी मंडळ, युवक मंडळ व महिला मंडळ आदींनी परिश्रम घेतले. एकूणच हा संपूर्ण कार्यक्रम बहारदार झाला.